स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग, (रोहयो प्रभाग)
नवीन प्रशासन भवन, ९ वा मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दूरध्वनी क्र.०२२ २२८१२३५१
Email ID : egsdesk2-mh@gov.in

क्रमांक : रोहयो १४२२/प्र.क्र. ७५/रोहयो-२ दिनांक- १९-०९-२०२४

प्रति,

विभागीय आयुक्त,
छत्रपती संभाजीनगर.

विषय- Criminal public Litigation No. २/२०२० **राजकुमार माधवराव देशमुख विरूध्द** UNION OF INDIA **व इतर श्री.आर.बी.शिंदे, तत्का. वनपरिक्षेत्र अधिकारी, परळी वै.जि.बीड.**

संदर्भ- आपले पत्र क्र.२०२२/रोहयो/जन-२/सीआर २८/कावी, दि.२६/०९/२०२२.

**महोदय,**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये बीड जिल्हयातील मग्रारोहयो अंतर्गत झालेल्या लेखापरिक्षण अहवालातील गंभीर अनियमिततेबाबत व त्रुटीबाबत दोषी आढळून आलेले श्री.आर.बी.शिंदे, तत्का. वनपरिक्षेत्र अधिकारी, परळी वै. जि. बीड यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्याच्या परवानगीसाठी प्रस्ताव शासनास सादर केला होता.

तथापि श्री.आर.बी.शिंदे हे दि.३०/०५/२०२० रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच अनियमिततेच्या घटनेचा कालावधी हा सन २०१६-१७ मधील आहे. निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम २७ (२) (बी) (दोन) मधील तरतुदीनुसार शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर चार वर्षापुर्वीच्या घटनेची चौकशी करता येत नाही. त्यामुळे श्री.आर.बी.शिंदे, तत्का. वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याविरूध्द विभागीय चौकशीस मान्यता देता येणार नाही.

आपण श्री. शिंदे यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २६.०९.२०२२ रोजी शासनास सादर केला. सदर प्रस्ताव हा श्री.शिंदे हे सेवानिवृत्त झाल्यानंतर व घटनेच्या कालावधीपासून चार वर्षानंतर शासनास सादर केला असल्याने विभागीय चौकशी सुरु करण्यास शासनाची मान्यता देणे शक्य नाही. सबब सदर प्रकरणी चौकशी करून विलंबास जबाबदार असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(ज.जि.वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन